**वाचा** :-१)शासन पत्र क्र.पी.टी.सी./१९७४/१०२५७६/दिनांक २०-२-१९७४
२)शिक्षणाधिकारी (प्रा)जि.प.औबाद यांचे पत्र क्र.प्रावि-३/शिक्षण/०६/४६४/दि.२७-२-२००६
३)अध्यक्ष/सचिव गोदावरी मल्टीपर्पज चॅरिटेबल ट्रस्ट औबाद यांचा ठराव क्र.३ दि. १५-१-०६
४)अध्यक्ष/सचिव मॉंटेसरी बालक मंदिर शिक्षण संस्था औबाद यांचा ठराव क्र.३ दि.३०-१-०६
५)शिक्षण उपसंचालक,औरंगाबाद यांचे समक्ष झालेली सुनावणी दि.२४-४-२००६
६)शिक्षणाधिकारी (प्रा) जि.प.औरंगाबाद यांचा दिनांक २७-४-२००६ चा अहवाल

------------------*********------------------

जा.क्र.प्रावि-३/२००६-०७/ 8594/99
विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय,
औरंगाबाद विभाग,औरंगाबाद.
दिनांक :- 16 MAY 2006

**विषय:- गोदावरी मल्टीपर्पज चॅरिटेबल ट्रस्ट औरंगाबाद संचलित विद्यामंदिर वाळुज ता गंगापूर जि औरंगाबाद ही प्राथमिक शाळा मॉंटेसरी बालक मंदिर शिक्षण संस्था औरंगाबाद या संस्थेस कायम स्वरुपी हस्तांतरित करणेबाबत**

---

## आ दे श :-

शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद औरंगाबाद यांनी शिफारस केल्यानुसार आणि शासन निर्णय पीटीसी/ १९७४/ १०२५७६ दिनांक २०-२-१९७५ अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन विभागीय शिक्षण उपसंचालक औरंगाबाद हे गोदावरी मल्टीपर्पज चॅरिटेबल ट्रस्ट औरंगाबाद संचलित विद्यामंदिर वाळूज ता गंगापूर जि औरंगाबाद ही विना अनुदानित प्राथमिक शाळा मॉंटेसरी बालक मंदिर शिक्षण संस्था औरंगाबाद या संस्थेस कायम स्वरुपी हस्तांतरित करण्यास शैक्षणिक वर्ष २००६-२००७ पासून खालील अटीच्या अधिन राहून परवानगी देण्यात येते.

१) गोदावरी मल्टीपर्पज चॅरिटेबल ट्रस्ट औरंगाबाद संचलित विद्यामंदिर वाळूज ता गंगापूर जि.औरंगाबाद या शाळेस शाळा संहिता आणि शर्तीचे पालन करणे बंधनकारक राहील.

२) गोदावरी मल्टीपर्पज चॅरिटेबल ट्रस्ट औरंगाबाद या संस्थेने सदर शाळेतील सर्व शालेय अभिलेखे, नोंदवहया,शैक्षणिक साहित्य इ.मॉंटेसरी बालक मंदिर शिक्षण संस्था औरंगाबाद या संस्थेकडे हस्तांतरित करणे बंधनकारक राहील.

३) गोदावरी मल्टीपर्पज चॅरिटेबल ट्रस्ट संचलित विद्यामंदिर वाळूज ता गंगापूर जि औरंगाबाद या शाळेतील वर्ग चालविण्यासाठी आवश्यक त्या सोयी मॉंटेसरी बालक मंदिर शिक्षण संस्था औरंगाबाद या संस्थेने उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील.

४) गोदावरी मल्टीपर्पज चॅरिटेबल ट्रस्ट औरंगाबाद संचलित विद्यामंदिर वाळूज ता गंगापूर जि औरंगाबाद या शाळेतील सर्व शिक्षक मॉंटेसरी बालक मंदिर शिक्षण संस्था औरंगाबाद या संस्थेकडे हस्तांतरित झाली तरी त्याच शाळेत सेवेत राहतील. सदर कर्मचा-यांची वैयक्तिक मान्यता करुन घेण्याची जबाबदारी संस्थाचालकाची राहील त्याबाबत कांही प्रश्न/प्रकरण उदभवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी मॉंटेसरी बालक मंदिर शिक्षण संस्था औरंगाबाद यांची राहील.

५) गोदावरी मल्टीपर्पज चॅरिटेबल ट्रस्ट संचलित विद्यामंदिर वाळूज ता गंगापूर जि औरंगाबाद या शाळेचे हस्तांतरण करण्यापूर्वीचे तक्रारी /कोर्टकेस किंवा आर्थिक व्यवहार अथवा वसूली निघाल्यास त्याची सर्व जबाबदारी मॉंटेसरी बालक मंदिर शिक्षण संस्था औरंगाबाद यांची राहील

६)संस्थेत कांही वाद किंवा न्यायालयीन प्रकरणे नसल्याबाबत शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद औरंगाबाद यांनी हस्तांतरणाच्या वेळी खात्री करुन घ्यावी.

७)गोदावरी मल्टीपर्पज चॅरिटेबल ट्रस्ट औरंगाबाद संचलित विद्यामंदिर वाळूज ता गंगापूर ओरंगाबाद या शाळेचे हस्तांतरण सर्व शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी आणि वर्गासह तसेच शैक्षणिक व भौतिक सुविधेसह करणे बंधनकारक राहील.

८)शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद औरंगाबाद यांनी सदर शाळेतील शिक्षकांची वैयक्तिक मान्यता अनुशेष तपासून घेऊन अनुशेषाप्रमाणे वैयक्तिक मान्यता देण्याच्या अटीवर सदर हस्तांतरणास परवानगी देण्यात येत आहे.

विद्यामंदिर वाळूज ता गंगापूर जि औरंगाबाद या शाळेचे हस्तांतरण शिक्षणाधिकारी (प्राथमिक)जिल्हा परिषद औरंगाबाद यांचे समक्ष होईल. हस्तांतरणाच्या वेळी दोन्ही संस्थेचे अध्यक्ष/सचिव सदर शाळेचे अध्यापक यांनी उपस्थित राहून हस्तांतरणाची कार्यवाही पुर्ण करावी आणि केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

24/11

शिक्षण उपसंचालक,
औरंगाबाद विभाग औरंगाबाद

प्रतिलिपी:-

१) मा.अवर सचिव,शालेय शिक्षण विभाग मंत्रालय,विस्तारभवन मुंबई-३२

२) मा.शिक्षण संचालक(प्राथमिक)शिक्षण संचालनालय म.रा.पुणे-१

३)शिक्षणाधिकारी (प्राथमिक)जिल्हा परिषद औरंगाबाद यांना देवून कळविण्यात येते की हस्तांतरणाची कार्यवाही पूर्ण करुन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

४) अध्यक्ष/सचिव, गोदावरी मल्टीपर्पज चॅरिटेबल ट्रस्ट औरंगाबाद

५)अध्यक्ष/सचिव मॉंटेसरी बालक मंदिर शिक्षण संस्था औरंगाबाद

६) मुख्याध्यापक विद्यामंदिर वाळूज ता गंगापूर जि . औरंगाबाद